"जनहितार्थ सर्वदा"

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

Email: labour7.ield-mh@nic.in

दिनांक : १० जुलै, २०२४

क्रमांक : इबांका-२०२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी बिल्डींग, ई-ब्लॉक, सी- २२,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

**विषय:-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता **BOMT (Build Operate Manage Transfer)** या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" ही योजना राबविण्याबाबत.

**संदर्भ:-** (१) उद्योग, ऊर्जा, कामगार विभाग शासन निर्णय क्र.इबांका-२०२३/प्र.क्र.७७/काम-७, दिनांक ०७.०८.२०२३

(२) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/ योजना-०६/६१८/२०२४, दिनांक १०.०७.२०२४

महोदय,

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता **BOMT (Build Operate Manage Transfer)** या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" ही योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाने शिफारशीसह शासन मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

२. त्यास अनुसरुन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता **BOMT (Build Operate Manage Transfer)** या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" ही योजना राबविण्याबाबतच्या मंडळाच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. या प्रस्तावाच्या अनुषंगाने एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) या संस्थेसोबत मंडळामार्फत सामंजस्य करार (MoU) करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही मंडळ स्तरावरुन करण्यात यावी.

४. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी सदर योजना क्षेत्रीय स्तरावर राबविताना यापूर्वीच्या संदर्भीय शासन निर्णयाद्वारे मान्यता

दिलेल्या (एच.एल.एल.लाईफकेअर लिमिटेड) व आता याद्वारे मान्यता देण्यात आलेल्या (एच.एस.सी.सी. (इंडीया) लिमिटेड) या दोन्ही संस्थांशी समन्वय साधून अंमलबजावणीची सविस्तर कार्यपद्धती निश्चित करावी.

आपला,

( दिपक पोकळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- निवडनस्ती (कामगार-७)